जनसंपर्क कक्ष
16 JUN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारत बांधकाम आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एस. आर. पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. जी. एस. कुलकर्णी आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये मल्टिमीडिया जर्नालिझम, डिजिटल लायब्ररी, पॉड कास्ट सुरू करावे

## डॉ. प्रतापसिंह जाधव; नवीन इमारत बांधकाम आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन हे देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन आहे. भविष्यकाळाचा विचार करून एकाच ठिकाणी मल्टिमीडिया जर्नालिझम, नवनवीन अभ्यासक्रमांबरोबरच डिजिटल लायब्ररी, पॉड कास्ट या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. जेणेकरून अध्यासनात देशभरातील विद्यार्थी शिकण्यासाठी येतील यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी केली.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारत बांधकामाची गुरुवारी डॉ. जाधव यांनी पाहणी करून काही सूचना केल्या. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जाधव यांनी अध्यासन इमारत बांधकामाचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले, अध्यासन इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर चांगल्या प्रकारे लँड स्केपिंगसह इतर गोष्टी करता येतील.

अध्यासन इमारतीमध्ये सर्व सोयींनी सज्ज, अद्ययावत ऑडिटोरियम, क्रोमा स्टुडिओ, कंट्रोल रूम, ऑडिओ, व्हिडीओ विंग तयार करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करावी. अध्यासनात ये-जा करण्यासाठी मुख्य एकच प्रवेशद्वार असावे. विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख नवनवीन कोर्सेस सुरू करावेत. तसेच विद्यार्थ्यांना बसण्यासाठी कॅफेट एरिया तयार करावा. ३० जुलैअखेर इमारतीचे सर्व बांधकाम पूर्ण करावे, अशी सूचना डॉ. जाधव यांनी केली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अध्यासन इमारतीचे काम पूर्ण करताना पावसाळ्याच्या अनुषंगाने प्रत्येक गोष्टीची खबरदारी घ्यावी. अध्यासन नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे.

अभियंता डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी, नॅशनल हायवेवरून इमारत दिसावी, या अनुषंगाने प्रवेशद्वाराची कमान उभारण्यात यावी, असे सांगितले. करण मिरजकर यांनी, साईन बोर्डसंदर्भातील माहिती दिली. यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनिता पाटील, हेमा जोशी, बांधकाम ठेकेदार सुनील नागराळे, उपकुलसचिव रणजित यादव, आर्किटेक्ट महेश डोईफोडे यांच्यासह विद्यापीठ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

16 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा काळात बाजारपेठांची भूमिका महत्त्वाची

## प्रा. डॉ. कुलकर्णी : इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनामध्ये व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नागरीकरण ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि त्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य लोकांच्या जीवनात महत्त्वाचे बदल झाले. या काळात महाराष्ट्राच्या नागरीकरणात कसबा, पेठा, छोट्या बाजारपेठांनी महत्त्वाची भूमिका निभावली, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.

इतिहास अधिविभाग शिवाजी विद्यापीठ आयोजित शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रातील प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी स्मृती व्याख्यानमालेत 'मराठेकालीन महाराष्ट्रातील नागरीकरण' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. नंदा पारेकर होत्या.

प्रा. डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, १८ व्या शतकात बाजारपेठाचे स्वरूप विस्तारले. नवीन पेठा वसवल्या गेल्या. महाराष्ट्रात कसबा ही बाजारपेठेची ठिकाणे म्हणून ओळखत. कसब्याचे महत्त्वाचे काम म्हणजे आसपासच्या खेड्यातील लोकांच्या दैनंदिन गरजा भागवणे हे होते. काही कसबे हे व्यापारी मार्गावर, तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होते. मराठा काळात वाई, रहिमतपूर, कोल्हापूर, कराड इ. ठिकाणी कसब्यांची निर्मिती झाली. पुढे याचेच रूपांतर छोट्या शहरांमध्ये झाले.

स्वागत इतिहास अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी केले. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, प्राचार्य व्ही. एन. व्हनमाने, प्राचार्य विलास पोवार, प्राचार्य एस. एस. पाटील, प्राचार्य इस्माईल पठाण, प्राचार्य अंकुश बेलवटकर, छत्रपती शाहू अध्ययन केंद्राच्या समन्वयिका डॉ. निलांबरी जगताप आदी उपस्थित होते. आभार डॉ. दत्तात्रय मचाले यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष

15 JUN 2003 महासत्ता। शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक कौशल्यावर आधारित शिक्षणाची गरज : प्रा. देशमुख



रुकडी ,ता.१४ (वार्ताहर)-

........................

महाराष्ट्र शासनाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' विद्यापीठांशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांसाठी सन २०२४-२०२५ पासून लागू करण्याचे ठरवले आहे, पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक व कौशल्यावर आधारित शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. परंतु या धोरणास अनुसरून महाविद्यालयातील अभ्यासक्रमामध्ये रचनात्मक बदल करण्याची गरज आहे, त्यासाठी शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालये आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ ( सुटा) यांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची गरज आहे.असे मत शिवाजी विद्यापीठ मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.एम.एस. देशमुख यांनी वक्तव्य केले.

ते येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि नवीन अभ्यासक्रम संरचना या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेत बीजभाषक म्हणून बोलत होते. प्रस्ताविक प्रा. डॉ. आर. के.चव्हाण यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डा. प्रशांतकुमार कांबळे होते. या कार्यशाळेत प्रा.डॉ. आर. जी. कोरबू, प्रा.डॉ.प्रकाश कुंभार, प्रा.डा. सुधाकर मानकर यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर.कुंभार यांनी शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. गजानन चव्हाण, सुटाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील २५० पेक्षा जास्त प्राध्यापक उपस्थित होते. आभार डॉ. विजय देसाई यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. माधवी सोळांकुरकर यांनी केले.

तरूण भारत

# कोल्हापुरात गोल बुबुळाची आढळली पाल



- कोल्हापुरातील टिंबर मार्केट परिसरात या पालीचे अस्तित्व
- केरळ-तामिळनाडू येथून होणाऱ्या लाकडांच्या वाहतुकीसोबत आली

प्रतिनिधी
कोल्हापूर

केरळ– तामिळनाडू येथून होणाऱ्या लाकडांच्या वाहतुकीसोबत येथील टिंबर मार्केट परिसरात 'निमास्पीस ग्रासीलीस" या गोल बुब्बुळाच्या पालीचे अस्तित्व सिद्ध झाले आहे. या पालीच्या आढळ क्षेत्राची व्याप्ती आणि पुनर्वर्णन करणारा शोधनिबंध 'झूटॅक्सा' या आंतराष्ट्रीय संशोधन पत्रिकेतून प्रकाशित झाला आहे. या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्ड लाईफ फाऊंडेशनचे अक्षय खांडेकर, तेजस ठाकरे आणि ईशान अगरवाल तसेच शिवाजी विद्यापीठाचे प्राणिशास्त्राचे प्रा. सुनील गायकवाड आणि 'बीएनएचएस'चे सौनक पाल यांचा सहभाग आहे.

'निमास्पीस ग्रासीलीस' या गोल बुब्बुळाच्या पालीचा शोध १८७० मध्ये रिचर्ड बेडोम या ब्रिटीश संशोधकाने लावला. अंगावरील आकर्षक रंग आणि छोट्या आकारांवरून या पाली लक्ष वेधून घेतात. संशोधनामध्ये ही पाल तिचा नैसर्गिक अधिवास सोडून इतरत्र प्रसारीत झाल्याची पहिलीच नोंद टिंबर मार्केट परिसरातून करण्यात आली. ही पाल पहिल्यांदा विवेक कुबेर यांना टिंबर मार्केट परिसरात निदर्शनास करण्यात आली. ही पाल पहिल्यांदा विवेक कुबेर यांना टिंबर मार्केट परिसरात निदर्शनास आली. त्यांनी पुरवलेल्या माहितीच्या आधारे पुढे या पालीचा अधिकच अभ्यास केला. मानवी हस्तक्षेपामुळे नैसर्गिक अधिवासाच्या बाहेर होणाऱ्या प्राण्यांच्या प्रसाराचा त्या अधिवासावर व प्राण्यांवर काय परिणाम होतो, हे तपासण्यासाठी संशोधनाची गरज असल्याचे प्रा. सुनील गायकवाड यांनी सांगितले. 'निमास्पीस ग्रीसीलीस' ही पाल छोटा आकार आणि आकर्षक रंगामुळे स्पष्टपणे वेगळी ओळखता येते. या पालींचे नर माद्यांपेक्षा अधिक आकर्षक असतात. या पाली दिनचर असून दिवसा आपले भक्ष्य पकडण्यासाठी बाहेर पडतात. असे अक्षय खांडेकर यांनी सांगितले.

16 JUN 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळी सत्र पदवी परीक्षेला १२ हजार ४८२ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांतर्गत गुरुवारी १२ हजार ४८२ विद्यार्थी परीक्षेला बसले.

विद्यापीठाच्या परीक्षा २५ मेपासून सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, मास्टर ऑफ



आर्टस्, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे), बीएस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स), मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीत पार पडल्या आहेत.

दरम्यान, आज बीए (डिफेन्स स्टडीज), बीएस्सी (इन्व्हायर्न्मेंटल सायन्स), बी.व्होक. (फूड प्रोसेसिंग मॅनेजमेंट) आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. आजअखेर १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# विद्यापीठातील आठरा परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२३ उन्हाळी परीक्षा सुरू आहेत. या परीक्षेतील १८ विषयांचे निकाल आवघ्या सहा दिवसाच्या आत जाहीर केले आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी परीक्षा संपल्या की पाच ते सहा दिवसात निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच पदवी व पदव्युत्तरच्या अनेक विषयांची परीक्षा गुरुवारी झाली.